संशोधन आराखडा

"महाराष्ट्र शासनाची महिला सक्षमीकरणाची धोरणे आणि महिलांच्या सद्यस्थितीचा अभ्यास"-विशेष संदर्भ नांदेड जिल्हा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव विज्ञान विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या प्रबंधाचा गोषवारा

संशोधक

तेलंगे आरती राम

(एम.ए. अर्थशास्त्र)

मार्गदर्शक

डॉ. अण्णाजी दयाराम मडावी

अर्थशास्त्र विभाग प्रमुख

आदर्श शिक्षण संस्थेचे

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हिंगोली.

संशोधन केंद्र

सामाजिकशास्त्रे संकुल

स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड

डिसेंबर – 2024.

"महाराष्ट्र शासनाची महिला सक्षमीकरणाची धोरणे आणि महिलांच्या सद्यस्थितीचा अभ्यास -विशेष संदर्भ नांदेड जिल्हा"

प्रस्तावना :-

मानवी समूहात स्त्रीजातीचा जवळपास निम्मा हिस्सा आहे. स्त्री हीच मानवाच्या उत्पत्तीची जननी आहे. स्त्री आणि पुरुष जन्मतः दोघेही नैसर्गिक दृष्ट्या समान आहेत, परंतु मानव निर्मित समाजव्यवस्थेने समाजाने लिंगभेदाच्या आधारावर स्त्री- पुरुषांमध्ये श्रेष्ठ आणि कनिष्ठ असे दोन भागात विभाजन केले. भारतामध्ये स्त्रियांना आदिशक्ती, दुर्गा, पुरुषाची अर्धांगीनी अशी उपमा देऊन तिचा गौरव केला जातो. तिची नवरात्री दरम्यान नवकन्या, नवदुर्गा म्हणून पुजा केली जाते. परंतु हा फक्त समाजाचा एक दिखावा आहे. कारण समाजामध्ये विशेषतः कुटुंबामध्ये पुरुषाच्या तुलनेत स्त्रियांना गौण स्थान देण्यात आले आहे. तिला तिच्या अनेक प्रकारच्या अधिकारांपासून वंचित ठेवण्यात आले आहे. हे आपल्याला वैदिक काळ, मध्ययुगीन काळ, स्वातंत्र्यापूर्वीचा काळ व स्वातंत्र्यानंतरचा काळ अशा प्रत्येकच काळात दिसून येते. स्त्रियांचे क्षेत्र फक्त चुल आणि मुल' इनकेच मर्यादित करण्यात आले आहे. स्त्रियांनी फक्त कुटुंब योग्य प्रकारे सांभाळले पाहिजे यातच कुटुंबाची शोभा असते. अशी समाजाची अपेक्षा असते.

याचा परिणाम असा झाला की, स्त्रियांचा सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक आणि शैक्षणिक विकास होऊ शकला नाही. ही परिस्थिती केवळ भारताचीच नाही तर संपूर्ण जगामध्ये याच • प्रकारचे चित्र दिसून येते. म्हणूनच स्त्री ही पुरुषांप्रमाणे शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय दृष्ट्या सक्षम व्हावी म्हणून सर्वप्रथम 1985 मध्ये नैरोबी, येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय महिला सम्मे लनामध्ये महिला सक्षमीकरणाचे बिजारोपन करण्यात

आले. त्यानंतर भारताने सुद्धा 2001 हे वर्ष महिला सक्षमीकरणाचे वर्ष म्हणून जाहीर केले. महाराष्ट्र शासनाने सुद्धा 2001 हे वर्ष महिला सक्षमीकरणाचे वर्ष मानले.

अर्थ व व्याख्या :-

- **(व्याख्या) :-**

"योजना, कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांना पुरुषांच्या बरोबरीने सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय आणि कौटुंबिक अश्या सर्वच क्षेत्रामध्ये निर्णयक्षम बनविणे, स्त्री-पुरुष असमानता नष्ट करणे, स्त्रियांना पुरुषांसारखी विकासाची संधी उपलब्ध करून देणे या प्रक्रियेला महिला सक्षमीकरण' असे म्हणतात."

- **(अर्थ) :-**

वरील व्याख्यावरून असे लक्षात येते की, महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना स्वतःच्या अधिकारांप्रती जागृत करणे होयः ज्याप्रमाणे पुरुष हा मानव प्राणी आहे, त्याचप्रमाणे महिला देखील एक मानव प्राणीच आहे ती पुरुषांपेक्षा वेगळी नाही ती सुद्धा पुरुषांप्रमाणे निर्णय घेण्यास सक्षम आहे. ही भावना तिच्यामध्ये रुजविणे होय,

*** संशोधन साहित्याचा आढावा :-**

स्त्री ही मानवी सजीव सृष्टीची जननी आहे. तसेच ती मानवाच्या उत्पत्तीची जननी सुद्धा आहे. स्त्री व पुरुष या निसर्गाने निर्माण केलेल्या मानवी जाती परस्परावलंबी आहेत. म्हणूनच संसाराचा रथ योग्य पध्दतीने चालविण्यासाठी स्त्री व पुरूष या दोघांचीही भूमिका महत्वाची असते कोणत्या एकट्याने संसाराचा रथ योग्य पद्धतीने चालू शकत नाही. दोघेही महत्त्वाचे असले तरी समाजामध्ये महिलांच्या तुलनेत पुरूषांना महत्वाचे स्थान आणि दर्जा देण्यात आलेला आहे. याच कारणांमुळे महिला पुरुषांच्या तुलनेत मागे पडलेल्या आहेत.

महिलांमध्ये 'स्व' जाणिवांचा विकास करणे, तिच्या हक्क व अधिकारांविषयी तिला जागृत करणे, तिला निर्णय घेण्यास सक्षम बनविणे यासाठीच शासनाने महिला सक्षमीकरणाव धोरण स्विकारले आहे. हे भारतातील महीला सक्षमीकरणाचे वर्ष म्हणून साजरे केले जाते.

*** महिला सक्षमीकरण म्हणजे काय ? :-**

योजना, कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांना पुरुषांच्या बरोबरीने सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि कौटुंबिक अशा सर्वच क्षेत्रामध्ये निर्णयक्षम बनविणे, स्त्री-पुरूष असमानता नष्ट करणे, स्त्रियांना पुरूषांसारखी विकासाची संधी उपलब्ध करून देणे या प्रक्रियेला महिला सक्षमीकरण असे म्हणतात.

वरील व्याख्यांवरून असे लक्षात येते की, महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना स्वतःच्या अधिकारांप्रती जागृत करणे होय. ज्याप्रमाणे पुरुष हा मानव प्राणी आहे, त्याचप्रमाणे महिला देखील एक मानव प्राणीच आहे. ती पुरूषांपेक्षा वेगळी नाही. ती सुद्धा पुरुषांप्रमाणे निर्णय घेण्यास सक्षम आहे. ही भावना तिच्यामध्ये रुजविणे होय.

*** महिला सक्षमीकरणाचे विविध उपक्रम :-**

2001 हे वर्ष भारताने महिला सशक्तीकरण वर्ष म्हणून घोषित केले. या वर्षात महिलांना सक्षम बनविण्यासाठी खालील बाबींवर भर देण्यात आले आहे.

1) महिलांच्या विकासासाठी कार्यक्रम, योजना तयार करणे तसेच या कार्यक्रम व योजनांना गतिमान करणे.

2) महिलांप्रती होणारे दुर्व्यवहार, हिंसाचार, अत्याचार कमी करण्यावर भर देणे.

3) महिलांना कौटुंबिक, आर्थिक निर्णय घेण्यास सक्षम बनविणे.

4) देशातील महिलांसाठी असे चित्र निर्माण करायचे की, त्यामुळे त्यांना सामाजिक आणि आर्थिक धोरण निर्मितीत सहभागी करून घेण्याबाबत जाणीव निर्माण करणे.

5) महिलांच्या शिक्षण, रोजगार आणि सामाजिक सुरक्षा यावर सहभाग निश्चित करणे.

6) पुरुषांप्रमाणे महिलांना सामाजिक, राजकीय, आर्थिक दृष्टया समान अधिकार देणे.

वरील सर्व बाबींवर महिला सक्षमीकरण वर्षामध्ये भर देण्यात आले.

*** महिला सक्षमीकरण आणि महिलांची सद्यस्थिती :-**

1) **सामाजिक क्षेत्रात महिलांची सद्यस्थिती :-**

पूर्वीपेक्षा आज महिलांच्या समाजिक दर्जामध्ये खूप सुधारणा झाले असल्याचे दिसून येते. त्या आज परंपरागत अनिष्ठ रूढी, परंपरेच्या पडद्यातून बाहेर पडत आहेत. सामाजिक बंधनातून त्या मुक्त होत आहेत. मानवी प्राण्यात सर्वात जास्त सहनशिल असणारा महिला वर्ग आज आपल्या मूलभूत अधिकारांविषयी जागरूक होताना दिसत आहे.

2) **आर्थिक क्षेत्रात महिलांची सद्यस्थिती :-**

स्वातंत्र्यापुर्वीच्या काळात महिला हया पुर्णतः पुरूषांवर अवलंबून असायच्या. म्हणजेच लहान वयात वडिलांवर, विवाह झाल्यावर पतीवर आणि वृद्ध झाल्यावर मुलांवर अवलंबून असायच्या. पुरूषांनी आर्थिक कामे करावी व महिलांनी चुल आणि सांभाळावी अशी समाजाची पूर्वी अपेक्षा होती. परंत आज मात्र स्त्रिया स्वावलंबी व आत्मनिर्भर बनत आहेत. ती आज उच्चशिक्षण घेऊन अर्थार्जन करीत आहे. आजच्या प्रषासकीय, वैद्यकीय, पोलीस प्रषासन, न्यायालयीन व्यवस्था, उद्योग आणि व्यापार अषा सर्वच ठिकाणी त्या दिसून येत आहेत. महिला आज स्वतंत्र व आत्मनिर्भर असल्याने त्या कोणावरही अवलंबून नाहीत.

3) **शैक्षणिक क्षेत्रात महिलांची सद्यस्थिती :-**

स्वातंत्र्यापुर्वीच्या काळात महिलांना शिक्षण घेण्याची संधी नव्हती. परंतु आज महिलांनी शिक्षणात खूप मोठ्या प्रमाणात प्रगती केली आहे. 1951 च्या जनगणनेमधे महिलांचे शिक्षणाचे प्रमाण फक्त 8.86 टक्के होते, तर 2011 च्या जनगणनेमध्ये महिलांच्या शिक्षणाचे प्रमाण 65.46 टक्के आहे. आज महिला सर्वच क्षेत्रातील शिक्षण घेत असल्याचे दिसून येते. म्हणून आज ती प्रशासकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, अभियंता, राजकीय पदाधिकारी अशा अनेक पदावर काम करीत असल्याचे दिसून येते.

4) **राजकीय क्षेत्रात महिलांची सद्यस्थिती :-**

पूर्वी स्त्रियांना निवडणूक लढविणेच काय तर मतदान करण्याचा सुद्धा अधिकार नव्हता. परंतु आज मात्र महिलांना निवडणूक लढविणे, मतदान हक्क बजाविणे याप्रकारचे अधिकार प्राप्त झाले आहेत. महाराष्ट्र शासनाने स्थानिक निवडणुकीत महिलांना 50 टक्के आरक्षण दिले आहे. यामुळे तळागाळातील महिलांना देखील राजकीय क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी मिळत आहे.

भारतामध्ये 2009 च्या 15 व्या लोकसभा निवडणुकीमध्ये 52 महिला वेगवेगळ्या राजकीय पक्षांतून निवडून आलेल्या होत्या. 2014 च्या 16 व्या लोकसभा निवडणुकीमध्ये 64 तर 2019 च्या 17 व्या लोकसभा निवडणुकीत 78 महिला खास म्हणून निवडून आल्या आहेत.

5) कौटुंबिक क्षेत्रात महिलांची सद्यस्थिती :-

स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात भारतामध्ये प्रामुख्याने संयुक्त कुटुंब पद्धती होती. या संयुक्त कुटुंबामध्ये पुरूषी सत्ता होती. परंतु आज भारतामध्ये संयुक्त कुटुंबाचे विघटन होऊन त्याची जागा विभक्त कुटुंबाने घेतलेली आहे. या कुटुंबात आता तिची भुमिका दासीसारखी न राहता ती कुटुंब प्रमुखाची सहचारी बनत आहे. ती आज कुटुंबातील सर्वच निर्णय प्रक्रियेत भाग घेत आहे. म्हणूनच आज तिला कुटुंबात सन्मान मिळत आहे.

➢ **अध्ययन विषयाची निवड :-**

महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांच्या असंभूत् क्षमतांचा विधायक विकास होणे. होय, स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने निर्णय प्रक्रियेत व सामाजिक, आर्थिक, सांस्कृतीत व व्यवस्थेत समान स्वरूपाची संधी, स्थान लाभ व प्रतिष्ठा. मिळाली पाहीजे. जननक्षमता लैगिकता श्रमावर तसेच विचारावर फक्त पुरूषांचे वर्चस्व न राहता स्त्रीयांना पुरूषांच्या बरोबरीने स्थान मिळणे आवश्यक आहे या सारख्या विचारास महिला सक्षमीकरणाचा पाया मानतात.

महिला सक्षमीकरण ही एक दीर्घकाळ व निरंतर चालणारी प्रक्रिया आहे या प्रक्रियेच्याहारे महिला सामुहिकपणे विकासाच्या ध्येयाने प्रेरित होऊन कार्यप्रवण राहतात, महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी स्वयंनिर्भर होतील तेव्हाच सर्व क्षेत्रात आत्मविश्वासाने

वावरू शकतील. खऱ्या अर्थाने त्याचे सबलीकरण होईल. स्वतःचे कुटुंब, समाज व राष्ट्राला त्यामुळे पुढे नेतील आणि प्रगती करतीला म्हणून मी हा विषय निवडलेला आहे.

- **संशोधन विषयाचे महत्व-**

आज स्वातंत्र्य प्राप्तीनंतर महिलांच्या स्थितीमध्ये खूप मोठ्या प्रमाणात परिवर्तन झाल्याचे दिसून येत आहे. त्या ही एक आज पुरुषांच्या बरोबरीचे स्थान मिळत आहे ही एक स्वागत करण्यायोग्य बाब आहे, परंतु असे असले तरी आज सुद्धा सर्वच क्षेत्रात महिलांप्रती अनेक बाबतीत असमानता दिसून येते तोर्चत ही असमानता नष्ट होत नाही, तोपर्यंत स्त्री सक्षमीकरणाचे धोरण यशस्वी होणार नाही.

- **संकल्पणा :-**

महिला सक्षमीकरण म्हणजे सामाजिक, आथिक, राजकिय, सांस्कृतीक व शैक्षणिक दृष्ट्या महिला शक्तीमान होणे होय. महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांच्या असंभूत क्षमताचा विधायक विकास होणे होय. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने निर्णय प्रक्रियेत व सामाजिक, राजकिय, आर्थिक व सांस्कृतीक व्यवस्थेत समान स्वरुपाची संधी, स्थान लाभ व प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. जननक्षमता, लैगिकता श्रमावर तसेच विचारांवर फक्त पुरुषांचे वर्चस्व न राहता स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान मिळणे आवशयक आहे. या सारख्या विचारास महिला सक्षमी करणाचा पाया मानतात. महिला सक्षमीकरण ही एक दिर्घकाळ व निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेच्या व्दारे महिला सामुहिकपणे विकासाच्या ध्येयाने

प्रेरित होऊन कार्यप्रवण राहातात. महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी स्वयनिर्भर होतील तेव्हाचाच सर्व क्षेत्रात आत्माविश्‍वासाने वावरु शकतील. खऱ्या अर्थाने त्याचे सबलीकरण होईल. स्वत:चे कुटुंब, समाज व राष्ट्राला त्यामुळे पुढे नेतील. स्वयं सहाययता समुहाचा चळवळीमुळे महिला सक्षपिकरणातील ब-याच प्रमाणात पोषक वातावरण निर्माण झालेले आपणाला दिसून येते. स्वयंसहायता समुहाद्वारे बचत, कर्ज, व्यवसायामार्गाने महिला समाजात स्वावलंबी बनण्याचा प्रयत्न करतांना स्वतारूच्या विकासावरोबर आपल्या कुटुंबाच्या आर्थीक आडचणी सोडविण्यास हातभार लावतात तसेच त्या या प्रेरणेतुन राजकारण प्रवेष करताना दिसतात. श्शासकीय धोरणामुळे त्याचा राजकिय सहभाग वाढला आहे. व ब-याच प्रमाणात महिलांची राजसाता निर्माण झालेली आहे. स्त्रियांच्या आत्मविश्‍वासात वाढ होताना आपणास दिसत आहे.

यावरुन ब-याच प्रमाणात सामाजिक दर्जात व स्थानात वाढ होतांना दिसते त्यामुळे सामाजिक व राजकिय दर्जात वाढ झालेली आपणाला दिसून येते. कुटूंबाच्या विकासामध्ये स्त्रियाचे खुप महत्व आहे. प्रत्यक्ष आर्थिक दृश्टीकोणातून तरी स्त्री विकास करीत नसलीतरी इतर बाबतीत कुटूंबातील मुले, पिता याचा विकास स्त्रीयांमार्फत होत असतो. कुटुंबातील स्त्री जर सबला असेल तर ती आपल्या मुलाचा, कुटुंबाचा विकास खुप चांगल्या प्रकारे करु शकते. जर स्त्रीयांना आर्थीक बाबतीत संधी दिली तर ती योग्य प्रकारे कुटुंब आर्थिक दृ ष्ट्या सक्षम करु शकते. व्याख्या सबलीकरण ही एक बहुविविध पैलू असलेली बहुस्तरीय आणि प्रवाही सकल्पना आहे. त्यामुळे सबलीकरण किंवा सक्षमीकरणाच्या बाबतीत एकच मत किंवा एकव विधान करता येत नाही. म्हणून वास्तव एकच व्याख्या करता येते नाही.

1) महिला सबलीकरण म्हणजे स्त्रीच्या अंगी निर्णय घेण्याची नियंत्रण करण्याचा संघर्ष करण्याची, मतप्रदशन करण्याचा कृ तीशील कार्यक्रमाचे आयोजन, लोकसंपर्क, आर्थिक व्यवहार करण्याची क्षमता व आवड निर्माण होणे यास महिला सबलीकरण म्हणतात.

2) अबला महिलांना सबला करण्यासाठी त्यांना समानसंधी देण्यासासाठी विचार मांडणे म्हणजे महिला सबलीकरण होय.

3) सामाजिक व आर्थिक दृष्टया स्त्रियावरील अन्याय व अत्याचार दूर करुन त्यांना न्याय मिळवून देणे म्हणजेच महिला सबलीकरण होय.

मानवी हक्काविषयी अनेक आंतरराष्ट्रीय करारात मान्यता मिळूनही स्त्रिया निर्धन आणि निरक्षर राहण्याचे प्रमाण मोठे आहे. वैद्यकीय सुविधा, मालमतेची मालकी, पत पुरवठा प्रशिक्षण आणि रोजगाराच्या बाबतीत पुरुषांच्या तुलनेत राजकिय दृष्टया सक्रीय असलेल्या प्रमाण कमीच दिसून येते. घरगुती हिसांचा बाबतीत जेवढे प्रमाण कार्य होणे आवश्यक आहे, तेवढे होतांना दिसत नाही स्त्रियांची मानसिकता बदलणे अतिशय महत्वाचे दिसून येत आहे. ग्रामीण भागात आतासुध्दा म्हणावे तेवढ्या प्रमाणात स्त्रिया अजूनही स्वत: निर्णय घेवू शकत नाहीत. या भागात आणखी देखील त्यांना पुरुषांच्या निर्णयावर अवलंबून राहतात. म्हणून त्यांची निर्णयसक्षता वाढविणे गरजेचे आहे. घटनेने त्यांना जे विविध प्रकारचे अधिकार दिलेले आहेत याची सविस्तर माहिती त्यांच्यापर्यंत पोहविली पाहिजे. त्याचे योग्य ते प्रबोधन झाले पाहिजे. अजूनही स्त्रि ही 100 टक्के सक्षम आहे हे आपण मान्य करु शकत नाही. ही वस्तुस्थिती आहे हे आपण मान्यच करावे लागेल स्त्रियांच्या बाबतीत निर्णय स्वतंत्र आपले जीवन कसे व्यतित करायचे, काय शिकायचे, कसे जगायचे, कोणाबरोबर जगायचे, कुठे जगायचे हया बाबतीत सर्वच निर्णय सक्षम स्त्रीला घेता यावेत. तिला भावनिक व

शारिरीक स्वातंत्र्याच्या बाबतीत, तिला आपल्या भावना व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य दिल्यास खऱ्या अर्थाने महिलांचे सक्षमीकरण झाले असे आपणास म्हणता येईल.

दैनदिन जीवनात अगदी सहजतेने विविध भूमिका पार पाडत महिला समाजाच्या आधारस्तंभ बनल्या आहेत. कधी प्रेमळ कन्या, तर कधी वात्सल्यपुर्ण माता, तर कधी सक्षम सहचारिणी अशी विविध नाती अत्यंत कुशलतेने आणि कोमलतेने त्या व्यवस्थीतपणे पार पाडतांना दिसतात म्हणजेच त्या आपली कर्तव्य निभावतना दिसतात असे असले तरी जगाच्या पाठीवर बर्याच ठिकाणी समाजाकडून त्यांच्याकडे दुर्लक्ष होताना दिसते तसेच महिला मोठया प्रमाणात सामाजीक असमानता, अत्याचार, आर्थिक पारंवन्तीबाबत आणि अन्य सामाजिक अत्याचारांना बळी पडतात अगदी काळा पासून महिलांवरील ही बंधने त्यांच्या वैयक्तीक आणी व्यावसायीक विकासाच्या आड येत आहेत. महिलांना समाजात सन्मान प्राप्त करुन देण्यासाठी आर्ट ऑफ लिव्हींगने समाजातील विविध स्तरावरील महिलांना आत्म सन्मान, अंतर्गत मजबुती आणि रचनात्मक विकासात कारणीभूत होती ल असे महिला सक्षमीकरण कार्यक्रम सुरु केले आहेत. या कार्यक्रमांमुळे महिला आता सर्व समस्यांवर मात करत आपले कौशल्य, आत्मविश्वास आणि उपयोगिताबाबात अग्रेसर होतांना दिसतात. आपल्या कुटुंबामध्ये, इतर महिलासाठी आणि समाजामध्ये शांतीचे आणि सकारात्मक सामाजिक परिवर्तनाचे प्रतिनिधीत्व करतांना दिसतात. जीवनात प्रगती आणि सक्षमीकरणासाठी (Mahila sashaktikaran) शिक्षणापेक्षा जास्त परिणामकारक काय असू शकते. आर्ट ऑफ लिविंगने शिक्षणाद्वारे देशातील काण्याकोपऱ्यातील ग्रामीण मुली आणि महिलांना समान दर्जाने सक्षम बनवले आहे. या वरुन असे सिध्द होते की, स्त्रियांना आत्मनिर्भर व स्वत:च्या पायावर उभे राहाण्यासाठी शिक्षणाची अत्यंत आवश्यकता दिसून येते त्यामध्ये यांत्रीक, कौशल्य, व्यवसायीक, तांत्रीक शिक्षण चालविणाऱ्या मुलींना व

स्त्रियांना भेटल्यास खऱ्या अर्थाने सबलीकरणाची सुरुवात झालेली दिसून येईल. पुर्ण जगात भारत देशाची संस्कृती परंपरा आध्यात्म व भौगोलीक विविधता यामुळे ओळखता जातो. ही नाण्याची एक बाजू झाली पण हाच देश जगभर पुरुषप्रधान संस्कृतीसाठी प्रसिध्द आहे. तस बघितले तर भारतात महिलांना आदर्श शक्तीचे रुप मानूनर पुरातन काळापासून पुजनीय मानले गेलेले आहे. त्याच वेळी याच भारतात महिला घरात आणि समाजामध्ये बंधनामध्ये आडकलेल्या आहेत त्यांना दुय्यम स्थान दिले जाते. त्यांचे अधिकार व विकास यापासून त्यंना बऱ्याच प्रमाणात दूर केले जाते. तरीसुध्दा स्त्री पुरुष समानतेच्या गोष्टी बोलल्या जातात. महिलांच्या स्वताच्या व अधिकाराविषयी कळकळ वाटत केली जाते. असे असतांना कोपर्डी किंवा निर्भयाकांड सारख्या घटना घडतांना दिसतात. अशा वेळेस महिलांचे प्रश्न बिकट समस्या म्हणून उभ्या राहतात. त्यावर उपचार म्हणून समाजास महिलांना स्वयत्तता सुरक्षा व संरक्षण देण्यासाठी सबलीकरणाने अभियानाची सुरुवात करतो पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्री आज समाज व कुटुंबाच्या बंधनात अडकून पडली आहे. अर्थात पिता, पती आण पुत्र यांच्या आदेशाने आणि बंधनाने ती आपले आयुष्य काढते नोकरदार स्त्रीयासुध्दा स्वतरूला पुर्णपणे सक्षम मानत नाहीत. त्यांच्यादृष्टीने कार्यक्रम घटनाचा पुरतेच मर्यादित सबलीकरण आहे. पण तसे न होता वास्तविकतेत महिलांना त्यांच्या क्षमताची जाणीव करुन वैयक्तीक स्वातंत्र्य व निर्णय घेण्याचा आधिकार मिळणे होय वैयक्तीक स्वातंत्रय व निर्णय घेण्याचा आधिकार मिळणे होय तरच त्यांना खऱ्या अर्थाने मुक्त स्वातंत्रयाचा लाभ घेता येईल. त्यांना त्यांच्या क्षमताची जाणीव करुन व त्यांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे तेव्हा त्यांना त्यांच्या एकूण अधिकाराची जावीण व माहिती होऊन त्यांचा विकास होण्यास मदत होईल व खऱ्या आर्थाने महिलांचे सबलीकरण होईल असे अभ्यासावरुन वाटते. मानवसमुहात स्त्रीजातीचा जवळपास निम्मा हिस्सा आहे. स्त्रियांशी दृतोत्साहीत करणारे वर्तन त्यांचा जीवनस्तर उंचावण्याकडे दुर्लक्ष करण्यापासून ते त्यांचा छळ आणि अत्याचार

करण्यापर्यंत अनेक प्रकारे हीनत्तवाची वागणूक स्त्रीजातीला मिळत राहिली आहे. हा भेदभाव दूर करुन स्त्रियांच्या प्रगतीस पोषक वातावरणाची निर्मीती आणी त्यांचे सुव्यवस्थीत नियोजन करणे आणि लैगिक समतेद्वारे जेंडर इक्वॉलिटी समाजाचे संतुलन साधने यासाठी पुरोगामी आणि विवेकी समाजाने बाळगलेला दृष्टिकोत केलेली कृती यांचा समुच्च म्हणजे स्त्री सक्षमीकरण, असे थोडक्यात म्हणता येईल. मानवी हक्काविषयी अनेक आंतरराष्ट्रीय करारात मान्यता मिळूनही स्त्रीया निर्धन आणी निरक्षर राहण्याचे प्रमाणे मोठे आहे. वैदयकीय सुविधा, मालमत्तेचा मालकी, पतपुरवठा, प्रशिक्षण आणी रोजगारात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना कमी संधी मिळते. त्या पुरुषांच्या तुलनेत राजकीय दृष्ट्या सक्रीय असण्याची शक्यता फारच कमी आहे आणि त्या घरगुती हिंसाचाराचा बळी होण्याची शक्यता खुपच मोठी आहे. स्त्रियांना मानसिकता बदलणे हे अतिशय महत्त्वाचे आहे. ग्रामीण भागात अजूनही स्वत:निर्णय घेऊ शकत नाहीत. इथे त्या पुरुषांच्या निर्णयावर अवलंबून राहतात. त्यांची निर्णय क्षमता वाढणे गरजेचे आहे. घटनेने अनेक अधिकारी दिलेले आहेत, याची माहिती त्यांच्यापर्यंत पोहचली पाहिजी प्रबोधन झाले पाहिजे ती अजूनही 100 टक्के सक्षम आहे हे आपण मान्य करु शकत नाही. म्हणून आणखी समाज व्यवस्था आणि शासन व्यवस्थेने महिला सबलीकरणाकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

*** अध्ययन विषयाची उद्दीष्टये :-**

1) नांदेड जिल्हयातील महिलांच्या विकासासाठी विविध कार्यक्रम, नव-नवीन योजना आखून कार्यक्रम व योजना गतिमान करण्यासाठीचा अभ्यास करणे.

2) नांदेड जिल्हयातील महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रातील सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

3) नांदेड जिल्हयातील महिला सक्षमीकरणाच्या धोरणांचा अभ्यास करणे.

4) नांदेड जिल्हयातील महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक अडचणी आणि समस्यांचा अभ्यास करणे.

5) महिला सक्षमीकरणासाठी महाराष्ट्र शासणाकडुन राबविण्यात येणाऱ्या किंवा मिळणाऱ्या विविध योजनांचा अभ्यास करणे.

*** अध्ययन विषयाची गृहितके :-**

1) नांदेड जिल्हयातील महिला सबलीकरणामुळे आणि महिलांना महाराष्ट्र शासनामार्फत विविध योजनांचा लाभ मिळाल्याने त्यांच्या शैक्षणिक व आर्थिक परिस्थितीत सुधारणा होत आहे.

2) नांदेड जिल्हयातील महिलांची प्रगती दिवसेंदिवस वाढत जरी असली तरी अजूनही 100 टक्के महिला सक्षमीकरण झालेले दिसून येत नाही.

3) नांदेड जिल्हयातील महिलांच्या स्थितीमध्ये मोठ्या प्रमाणात परिवर्तन दिसून आले असले तरीही अनेक क्षेत्रांत महिलांप्रती असमानता दिसून येत आहे

4) महिला सक्षमीकरणाचा बऱ्याच मोठ्या प्रमाणात फायदा होवून महिलांच्या प्रगतीचा चढता आलेख निदर्शनास येत आहे.

5) नांदेड जिल्हयातील महिला हया महिला सबलीकरणाच्या धोरणामुळे शिक्षणाकडे त्यांचा जास्त कल वाढलेला दिसून येतो.

- **संशोधनाची पद्धती - (Research Methodology) :-**

कोणत्याही विषयातील संशोधन करीत असतांना ने संशोधन शास्त्रशुद्ध व्हावे अचूक निष्कर्ष निघावेत, विषयाची उदिष्ट्ये साध्य करण्यासाठी आणि वस्तुस्थितीचे सत्य आकलन होण्यासाठी विषयानुरूप संशोधन पद्धतीचा अवलंब केला जातो.

संशोधन हे दोन प्रकाराच्या आधारावर नेमलेलेअसते.

1) **Primary Data & 2) Secondary Data.**

1) **प्राथमिक संशोधन (सामग्री)**- अनुसूचि, मूलाखत, प्रश्नावली, निरिक्षण आणि प्रत्यक्ष भेटून निरिक्षण व मुलाखतीच्या साहयायाने प्राथमिक माहिती संकलित केलेली असते.

2) **दुय्यम सामग्री** - यामध्ये प्रामुख्याने मेळावे, मासिके पुस्तके, अहवाल, वार्षिक ग्रंथ वर्तमानपत्रे,इ.चा समावेश होतो.

- **नमूना निवड पद्धती** - ( ) :-

प्रस्तुत विषय अभ्यासण्यासाठी नांदेडमधील 200 नमुना निवड संख्या घेवून संशोधक अभ्यासणार आहे, तसेच महिला सक्षमीकरणाबद्दलची महाराष्ट्र शासणाची जी धेरणे आहेत, त्यांचा थोडक्यात आढावा घेवून नांदेडमधील 200 महिलांच्या सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक सद्यस्थितीचा संशोधक अभ्यास करणार आहे.

प्रकरणाची रुपरेषा

प्रकरण 1 ले प्रस्तावना

अध्ययन विषयाच्या निगडीत प्रकरण.

प्रकरण 2 रे संशोधन साहीत्याचा आढावा. –

महाराष्ट्रातील महिला सक्षमीकरणाचे धोरणांविषयी आणि महिलांची सद्यस्थिचिया आढावा.

प्रकरण 3 रे महिला सक्षमीकरणासाठी. महाराष्ट्र शासनाच्या विविध योजना. –

महिलांच्या हितासाठी तसेच स्वावलंबी बनण्यासाठी महाराष्ट्र शासनाने अनेक विविध योजना राबविलेल्या आहेत त्याविषयी अभ्यास करणे.

प्रकरण 4 थे महिला सक्षमीकरण आणि नांदेड जिल्हयातील महिलांची सद्यस्थिती –

सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय आणि कौटुंबिक क्षेत्रातील महिलांची स्थिती.

प्रकरण 5 वे निकर्ष व शिफारशी –

संदर्भ ग्रंथ सूचीः

संदर्भ ग्रंथ :-

1) **भारतीय अर्थव्यवस्था** - रंजन कोळंबे,भगीरथ प्रकाशन पुणे,चौदावी आवृत्ती 2023

2)**आर्थिक संकल्पना** - डॉ. विनायक गोविलकर,डायमंड पब्लिकेशन्स,1691 पुणे प्रथम आवृत्ती मार्च 2008

3) **महिला धोरण** - 2014 महिला व बालविकास विभाग,माराष्ट्र शासन https:/ womenchild,maharashtragov.in

4) **स्त्री प्रश्नांची वाटचाल** - विद्यूत भागवत

5) **स्त्रीवादी,विचार आणि समिक्षांचा मागोवा** - पाटील शोभा (2007) स्नेहवर्धन प्रकाशन,पुणे

6) **सहयोगी मार्गदर्शन पुस्तीका** — महिला विकास महामंडळ

7) **योजना मासिक** - डिसेंबर 2024

मार्गदर्शक

डॉ. अण्णाजी दयाराम मडावी
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
आदर्श शिक्षण संस्थेचे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
हिगोली

संशोधक

तेलंगे आरती राम
एम. ए. अर्थशाख
सामाजिक शास्त्रे संकुल
स्वा. रा. ती. म. विद्यापीठ,
नांदेड